मंगळवार दि.४ जून २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २७७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता

बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंडे




Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# आमचा कोणताही आमदार काँग्रेसच्या संपर्कात नाही

## निवडणुकीनंतर पक्ष सोडण्याच्या चर्चेवर जयंत पाटलांची स्पष्टोक्ती



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आमच्या पक्षाचे आमदार सोनिया गांधी यांच्या संपर्कात आहेत ही माहिती तटकरे यांना कुणी दिली? आमचा कोणताही आमदार काँग्रेसच्या संपर्कात नाही, लोकसभेत आम्ही सर्व एकदिलाने काम केले, तर विधानसभेत देखील आम्ही एकीने काम करणार आहे, असे स्पष्टीकरण शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले.लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार गटाचे आमदार काँग्रेसमध्ये जाणार, असा दावा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला होता. त्यावर जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले.केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी जयंत पाटील यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियामध्ये येण्याची ऑफर दिली होती. जयंत पाटील पक्षात आल्यास त्यांना प्रदेशाध्यक्ष करु असे आठवले यांनी जाहीर केले होते. त्या ऑफरलाही पाटील यांनी उत्तर दिलं. 'रामदास आठवले यांनी मला ऑफर दिली. ते आपुलकीनं बोलले असतील. मी पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष आहे. मी इतर पक्षात कशाला जाऊ, असेही पाटील म्हणाले.जयंत पाटील यांनी एक्झिट पोलवर देखील मत व्यक्त केले. ते म्हणाले की, या लोकसभा निवडणुकीत आम्हाला ७ पेक्षा जास्त जागा मिळतील. तर महाविकास आघाडी राज्यात ३० ते ३५ जागा मिळवेल अशी अपेक्षा आम्हाला आहे.निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. यावर जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर उद्धव ठाकरे बोलले होते. मुंबईत मतदान संथ झालं त्यावर त्यांनी आक्षेप व्यक्त केले. या पत्रकार परिषदेत चुकीचं काहीही केलेले नव्हते, असेही जयंत पाटील म्हणाले.यापूर्वी सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांबाबत मोठा दावा केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटांतील एक मोठा गट काँगेसमध्ये जायच्या तयारीत आहे. य. मागील काही दिवसांपासून या आमदारांकडून सोनिया गांधी यांची भेट घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. पक्षांतर्गत नाराजीतून हे आमदार पक्षाला रामराम करण्याच्या तयारीत आहेत, असा दावा तटकरे यांनी केला होता.४ जूननंतर लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडतील. सातारा, सांगली, नागपूरसह मराठवाड्यातील महाविकास आघाडीचे अनेक नेते भाजपात जाणार आहेत, असा दावा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते मंत्री अनिल पाटील यांनी केला आहे. त्यावर देखील जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून शांतता भंग कराल तर ,याद राखा:- पो.नि.खेतमाळस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर कडा येथे शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळी अतिउत्साही काही लोकांमुळे सोशल मीडियामुळे होत असलेल्या अनेक ठिकाणी वाद-विवाद होऊन विकोपाला जात असून त्याचे परिणाम समाजावर होत आहेत. यामध्ये बाल गुन्हेगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. युवकांकडून समाजमाध्यमाचा दुरुपयोग होत असून समाज माध्यमाचा उपयोग सामाजिक सलोखा ठेवण्यासाठी करण्याचे आवाहन आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर यांनी केले.



कडा येथे आयोजित केलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सरपंच युवराज पाटील सभापती रमजान तांबोळी, माजी सरपंच अनिल ढोबळे, पोलीस निरीक्षक संतोष खेटमाळस, पोलीस उपनिरीक्षक विजय नरवाडे आदि उपस्थित होते. पुढे बोलताना धाराशिवकर म्हणाले की, सध्या समाज माध्यमावर धार्मिक तेढ होईल असे संदेश पसरवलेजात आहेत. यात तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. समाज माध्यमावर तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्धकायदे कडक असून ऐन तारुण्यात जर असे गुन्हे दाखल झाले तर त्या युवकांचे भवितव्य खराब होत आहे. याशिवाय सामाजिक सलोखा बिघडण्याचे काम जर कोणी केले तर त्याला सोडणार नाही असा सज्जड दमही त्यांनी यावेळी दिला.

पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी सांगितले की, येत्या दोन दिवसांमध्ये लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार असून यामध्येही कोणीही हुल्लडबाजी करून समाज किंवा एखाद्या धर्माच्या भावना दुखावतील असे दुष्कृत्य करू नये. असे कृत्य करणे कायद्याने गंभीर असून गुन्हे दाखल करून त्याला अद्दल घडविणार आहे. यासाठी प्रत्येक नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहनही खेतमाळस यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते माजी सरपंच अनिल ढोबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स.पो.उ.नि काकडे, पो.कॉ. मुझाहिद सय्यद, दीपक भोजे, सह कडा गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# राजस्थान मल्टिस्टेट पतसंस्थेच्या लातुर शाखेच्या अकरा सल्लागारांचा जामीन न्यायालयाने फेटाळला,सर्व धन दांडग्यांना गांधी चौक पोलीस अटक करणार का?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर | सुनिल बस्वराज हावा**




राजस्थान मल्टिस्टेट पतसंस्थेने ग्राहकांना ठेवीवर अवाढव्य व्याज देऊन अनेक गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी झालेल्या परळी येथे मुख्य शाखा असलेल्या राजस्थान मल्टिस्टेट पतसंस्थेतील पदाधिकाऱ्यांनी ३०० कोटी रुपयांचा अपहार केल्याचे उघड झाले आहे. यामुळे ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. लातूर जिल्ह्यातीलही शेकडो गुंतवणूकदारांचे पैसे अडकल्याने लातूर येथील ११ सल्लागार संचालकांवर गुन्हा दाखल झाला आहे. त्यांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. त्या संचालकांमध्ये लातुरातील नामवंतांचा समावेश आहे. मागीलझ दोन वर्षांपूर्वी परळी येथील चंदूलाल बियाणी यांनी राजस्थान मल्टिस्टेट पतसंस्थेची सुरुवात केली. पतसंस्थेचे नाव होण्यासाठी सुरुवातीच्या काळात या पतसंस्थेने ठेवीदारांना ठेवींवर ११ ते १२ टक्के व्याज देऊन आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. अल्पावधीतच या पतसंस्थेच्या महाराष्ट्रासह परराज्यातही ४१ शाखा सुरू करण्यात आल्या. या पतसंस्थेच्या व्याजामुळे अनेक सेवानिवृत्तांनी निवृत्तीनंतर आलेले सर्व पैसे याच पतसंस्थेकडे गुंतविले. परंतु, परळीच्या मुख्य शाखेलाच पोलिसांनी सील केले आहे. यामुळे हजारो गुंतवणूकदारांची पाचावर धारण बसली आहे. पतसंस्थेच्या शाखांमध्ये जाऊनही गुंतवणूकदारांच्या रकमा मिळत नसल्याने नरेंद्र अगरवाल यांनी लातूरचे सल्लागार संचालक असलेल्या अकरा जणांविरोधात गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार सल्लागार सत्यनारायण पन्नालालजी लड्डा, गोकुळदास मदनलाल चांडक, बालकिशन पांडुरंग मुंदडा, गंगाधर जवाहरलाल धूत,ज गोविंद गोपालदास कोठारी, कमलाकर राजाराम कुलकर्णी, बालाप्रसाद बन्सीलाल बिदादा, पांडुरंग मथुरालाल कचोलिया, गोविंदलाल लक्ष्मीनारायण पारीख, ओमप्रकाश कन्हैय्यालाल मुंदडा आणि सत्यनारायण बन्सीलाल हेड्डा या अकरा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. त्या सर्वांनी अटकपूर्व जामिनासाठी लातूर येथील जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे, असे येथील जिल्हा न्यायालयाचे सहायक सरकारी अभियोक्ता मंगेश महिंद्रकर यांनी सांगितले.

## रवी राणांचा राजकारणाशी काहीही संबंध आलेला नाही-संजय राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

रवी राणा यांचा राजकारणाशी काहीही संबंध आला नाही. त्यांनी फक्त त्यांचं बघावं असे म्हणत आमदार रवी राणा यांच्या दाव्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. तसेच तुम्ही कोणाचे गुलाम नाही हे निवडणूक आयोगाला सांगावं लागत आहे अशी खोचक टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. एक्झिट पोलचे निकाल समोर आले आणि इंडिया आघाडी, एनडीएसह राज्यातही महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेतेही दावे-प्रतिदावे करताना दिसत आहेत. अशातच आता निवडणूक निकालाला काही तास बाकी असतानाच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपासह निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे.आज प्रसार माध्यमांशी बोलतांना संजय राऊत म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणुकीच्या वेळी ध्यानात बसतात आणि मीडिया पूर्ण फोकस त्यांच्यावर करते हे कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन आहे.

# निराधार आजीला मिळाला दोन वर्षांनंतर धान्यांचा आधार

## ॲड.उमर शेखच्या मागणीला आले यश..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील कल्हाळी येथील एका वृद्ध निराधार महिलेला दोन वर्षापासून स्वस्त धान्य दुकानदारांकडून मोफत धान्य मिळत नव्हते. याबाबत फुलवळ येथील ड उमर शेख यांनी पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिजे यांना ही बाब निदर्शनास आणून दिली. मोहीजे यांनी लगेच याची दखल हेऊन त्या वृद्ध महिलेची नवीन आरसी बनवली. स्वस्त धान्य दुकानदाराला धान्य उपलब्ध करून देण्यासंबंधी सूचना केल्या. तदनंतर वृद्ध महिलेला धान्य मिळाले.

कल्हाळी येथील श्रीमती सुजलाबाई गिरी (वय ७० वर्ष) ही महिला मठात राहून हल्लाखीचे जीवन जगते.तिला पूर्वी मोफत धान्य मिळायचे. गेल्या दोन वर्षापासून तिची आरसी शेतकरी कुटुंबात असल्याचे कारण देत स्वस्त धान्य दुकानदार त्या महिलेला मोफत धान्य देत नव्हता.यामुळे त्या महिलेवर उपासमारीची वेळ आली होती. मठात मिळणाऱ्या अन्नावरच तिची गुजराण होत असे.धान्य मिळावे यासाठी ती वृद्ध महिला तहसील कार्यालयात चकरा मारून मारून बेजार झाली होती. कुणीच त्याची दखल घेतली नाही.

ॲड उमर शेख यांनी या महिलेला धान्य मिळावे, यासाठी पुढाकार घेतला. पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश महिजे यांना प्रत्यक्ष भेटून वृद्ध महिलेची कैफियत मांडली. धान्य मिळत नसल्याने महिलेचे कसे हाल होत आहेत हे समजावून सांगितले. नायब तहसीलदार गणेश मोहिजे यांनी तत्काळ याची दखल घेतली. महिलेची नवीन आरसी बनवून कल्हाळी येथील दुकानदार यांना फोन करून या महिन्याचे धान्य उपलब्ध करून द्यावे असे सांगितले. त्यामुळे त्यांना तात्काळ धान्य मिळाले. नवीन आरसी मिळाल्यामुळे वृद्ध महिलेला जगण्याचा आधार मिळाला.



**कंधार तालुक्यातील मौजे कल्लाळी येथील श्रीमती सुजलाबाई गिरी (वय ७० वर्ष) या महिलेला कोणतेही मूल बाळ,पती,नातेवाईक असे कोणीही नाही. अशा निराधार आजीला धान्य मंजूर करण्यात आले असून संबंधित स्वस्त धान्य दुकानदार त्यांना धान्य देणे आदेशित केले आहे, आणि आजी यांच्याकडून संपूर्ण कागदपत्रे घेऊन तात्काळ ऑनलाईन करून देण्यात आले आहे.अन्नसुरक्षा योजनेची खरे लाभार्थी आजी होती.पण ती अन्नसुरक्षा योजन `पासून वंचित होती.अशा वंचित लाभार्थी आजीला म्हातारपणीच धान्यांचा लाभ देऊन आधार देण्यात आला.**

**-गणेश मोहिजे नायब तहसीलदार पुरवठा विभाग कंधार**

## चारोळी

**मैत्री सारखं निखळ नातं**
**कुठेच शोधून सापडत नाही**
**अंतरंग ओसंडून वाहते अन**
**आठवांच्या हिंदोळ्यावर झुलत राही.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# मतमोजणी परिसरात ४ जून रोजी १४४ कलम लागू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली | सय्यद रहीम रजा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुषंगाने १५-हिंगोली लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिल, २०२४ रोजी मतदान झाले. मतमोजणी दि. ४ जून २०२४ रोजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, लिंबाळा मक्ता, हिंगोली येथे विधानसभानिहाय सकाळी ८ वाजेपासून होणार आहे. त्यानुषंगाने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतमोजणीच्या ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले असल्याचे आदेशात नमूद केले आहे.मतमोजणीच्या केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात सर्व पक्ष कार्यालय, उमेदवारांचे मंडप, सर्व दुकाने, मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स स्मार्ट वॉचेस, निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन व निवडणूक कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश निवडणुकीची कामे हाताळतांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून दि. ४ जून २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजेपासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी कळविले आहे.

# बाळाच्या लसीकरण नोंदणीसाठी युविन पोर्टल;नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली | सय्यद रहीम रजा**

भारत सरकारने संपूर्ण देशभरात नियमित लसीकरणासाठी युविन पोर्टलची निर्मिती केलेली आहे. नियमित लसीकरण हे युविन पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन राबविण्यात येत आहे. बाळाचे लसीकरण नोंदणी https/uwinselfregistration mohfw.gov.in/login या लिंकचा वापर करून घरी बसून करता येईल. यासाठी आपणास गुगलवरील उपरोक्त दिलेल्या लिंकवर बालकांच्या लसीकरणाची नोंदणी करावी. तसेच घराजवळ असलेल्या जवळच्या लसीकरण सत्राची निवड करावी. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आपण निवड केलेल्या लसीकरण स्थळी जाऊन बालकांचे लसीकरण पूर्ण करून घ्यावे. या लसीकरणांमध्ये बीसीजी, पोलिओ, आयपीव्ही, पीसीव्ही, पेंटा, एमआर आणि विटामिन ए व बूस्टर डोस देण्यात येत आहे. जेणेकरून पोलिओ, क्षयरोग, डांग्या खोकला, घटसर्प, धनुर्वात, गोवर रूबेला, अतिसार आणि मेंदूज्वर या आजारापासून बाळ सुरक्षित राहील आणि भावी पिढी सुदृढ व निरोगी बनेल. युविन प्री रजिस्ट्रेशनचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगूलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सुनील देशमुख यांनी केले आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन ६ जून 'लोकोत्सव'

# धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची, जागर शिवशाहीरांचा स्वराज्याच्या इतिहासाचा व सोहळा पालखीचा,स्वराज्याच्या ऐक्याचा ठरणार मुख्य आकर्षण

### ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हा-गंगाधर काळकुटे, पूजा मोरे, ऋषिकेश बेदरे,गोपाळ धाडे यांची पत्रकार परिषदेत माहिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

'राज्याभिषेक' शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे सुवर्णपान, यवनी सत्तांच्या अत्याचारातून महाराष्ट्रभूमीला स्वातंत्र्याचा हंकार देणार हा क्षण. शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार आले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला, मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला अन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदा या ऐतिहासिक घटनेस ३५० वर्षे पूर्ण होत आहेत.






अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२४ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. यंदा 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' कार्यक्रम शिवराज्याभिषेक महोत्सवाचे आकर्षण बिंदू असणार आहेत. देशभरातील लाखो शिवभक्तांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

यंदा गडावर पाच जूनला सायंकाळी पाच वाजता 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची' हा शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम होणार आहे. महाराष्ट्रातील युद्धकला आखाड्यांचा यात सहभाग असणार आहे. महाराष्ट्राची पारंपरिक युद्धकला कशी असते, याचे दर्शन गडावर येणाऱ्या तमाम देशवासियांना व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. पट्टा, तलवार, भाला, विटा, जंबिया, कट्यार, माहू, फरी गदका यांच्या विविध प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. सायंकाळी सात वाजता राज दरबार येथे 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' हा शाहीरी कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील शाहीर सहभाग घेणार आहेत.त्याचबरोबर ६ जूनला मेघडंबरीतील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला सुवर्ण नाण्यांचा अभिषेक झाल्यानंतर 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' या पालखी मिरवणुकीत महाराष्ट्रातील बारा बलुतेदार, अठरा अलुतेदारांसह सर्व धर्मातील लोक सहभागी होणार आहेत. आपापल्या पारंपरिक लोककलांचा मिरवणुकीत जागर घालणार आहेत. राजसदर, नगारखाना, होळीचा माळ, बाजारपेठ ते जगदीश्वर मंदिर असा पालखी सोहळ्याचा मार्ग असेल. या मार्गावरून पालखीवर पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सर्व शिवभक्तांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष यांचा वाढदिवस

# रायगड जिल्ह्यात शांतीवन येथील कुष्ठरोग निवारण समितीच्या आवारात वृक्षारोपण करून धुमधडाक्यात साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री विजयजी सूर्यवंशी साहेब यांचा वाढदिवस शांतीवन येथील कुष्ठरोग निवारण समितीच्या आवारात वृक्षारोपण करून धुमधडाक्यात साजरा करण्यात आला.ज्या संघटनेची स्थापनाच वृक्षारोपण करून करण्यात आली त्या संघटनेत वृक्षारोपणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे संस्थापक अध्यक्षांनी नारा दिला आहे की झाडे लावा झाडे जगवा.या उद्देशानेच वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात झाडे लावुन वाढदिवस साजरा करण्यात आला.रायगड जिल्हा उगमस्थान असल्यामुळे येथे दरवर्षी वाढदिवसानिमित्त झाडे लावुनच वाढदिवस साजरा केला जातो.म्हणून या वर्षी पण शांतीवन येथे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार,विश्वस्त मनिषा परमार,विश्वस्त झुंबर सिंग पाटील,विश्वस्त अनिकेत सुर्यवंशी,आदित्य सुर्यवंशी विश्वस्त विनायक शिंदे,रायगड जिल्हा अध्यक्ष धनाजी पुदाले, सचिव राजपाल शेगोकार,सह सचिव दत्तु ठोके,पनवेल तालुका रायगड जिल्हा कोषाध्यक्ष मच्छिंद्र पाटील अध्यक्ष गणेश पराड, अन्याय अत्याचार निवारण समितीचे पनवेल तालुका संघटक मंगेश खुटले,शिवधर्मचे सह संपादक अमोल पाटील,पत्रकार उमाजी मंडले,पत्रकार शितल पाटील,ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्रितमशिंग चव्हाण,नाशिक येथील कुणाल ठोके,छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या

अपर्णा कांबळे मॅडम,आकाश कुमार सर,विक्रांत सेन,निरमाली शर्मा,समृद्धी भोपे,जानवी ननावरे व आदिराज कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शहाजीबापू पाटील रुग्णालयात दाखल

# गुडघ्यावरील शस्त्रक्रियेनंतर शिंदे पोहोचले भेटीला, रुग्णालय गाठून तब्येतीची केली विचारपूस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांना ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे स्वतः मुख्यमंत्री शिंदे यांनी शहाजीबापू पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी शिंदेंनी पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पाटील यांच्या पायाच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली होती. मात्र त्यावेळी शिंदे हे त्यांच्या मूळ गावी होते. त्यानंतर सोमवारी शिंदे शहाजीबापू यांच्या भेटीसाठी रुग्णालयात पोहोचले.

शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर शिंदे यांनी फोनवरून शहाजीबापू पाटील यांची चौकशी केली होती. त्यानंतर आज रुग्णालय गाठून शिंदेंनी डॉक्टर आणि त्यांच्या नातेवाईकांकडून त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती जाणून घेतली आहे. तसेच त्यांनी लवकरात लवकर त्यांनी पूर्ण बरे होऊन पुन्हा एकदा जनसेवेसाठी कार्यरत व्हावे अशी अपेक्षा त्यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी यासंदर्भात ट्विट करत माहिती दिली आहे. त्यांनी शहाजीबापू पाटील यांच्या भेटीचे फोटोही शेअर केले आहेत. शिंदेंनी शहाजीबापू यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती दिली आहे. यावेळी शहाजीबापू पाटील यांचे कुटूंबीय आणि सहकारी तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे हेदेखील यावेळी उपस्थित होते.

# धोंडगे परिवाराच्या वतीने बाचोटी येथे 'रसाळी' ७ जूनला मेजवानी

### धोंडगे कुटुंबियांच्या वतीने दर वर्षी रसाळी स्नेह भोजन..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

धोंडगे परिवाराच्या वतीने बाचोटी येथे होणाऱ्या परंपरागत रसाळी स्नेह भोजन कार्यक्रमाचे शुक्रवार दि.७ जून रोजी सकाळी ११ ते ५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. राजकीय दृष्ट्या शंकरअण्णांच्या रसाळी कार्यक्रमाला वेगळेच महत्व असते. लोकसभा निवडणुकीत बी.आर. एस.पक्षाने घेतलेली भूमिका, आगामी विधानसभा निवडणूक व राजकीय वातावरण,यावर शंकरअण्णा काय बोलणार याची उत्सुकता आहे.

शेकडो वर्षा पासून बाचोटी (ता.कंधार ) हे गाव आंब्यासाठी प्रसिद्ध आहे.दूरवर पसरलेल्या येथील आंब्याच्या रसाची चव मित्र परिवार व राजकीय क्षेत्रातील कुटुंबाला घेता यावी यासाठी गत अनेक वर्षा पासून धोंडगे कुटुंबियांच्या वतीने दर वर्षी रसाळी स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. शेतकरी संघटनेच्या चळवळीत काम करीत असतांना राजकीय संघर्षाच्या काळात माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी सामाजिक राजकीय क्षेत्रातील सर्व पक्षीय मित्रांना,सहकार्यांना निमंत्रण देवून रसाळी कार्यक्रमास व्यापक स्वरूप दिले. तेंव्हा पासून आज पर्यंत दरवर्षी होणाऱ्या या रसाळी कार्यक्रमांस वेगळेच महत्व आहे.राजकीय क्षेत्रात ही या रसाळीची चर्चा होत असते.

राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिट्ठी देऊन बी.आर.एस पक्षाचा झेंडा हाती घेतल्या नंतर गत वर्षी झालेल्या बाचोटीच्या रसाळी कार्यक्रमात शंकरअण्णा धोंडगे यांनी कंधार - लोहा विधानसभा लढविणार असल्याची घोषणा करून रंशिंग फुंकले होते.



त्यावेळी प्रचंड प्रमाणात उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी हात उंचावून आगे बडोचा नारा दिला होता.'बीआरएस' पक्षाचे राज्य समन्वयक असलेल्या शंकरअण्णांनी राज्य भर दौरे करून राज्यातील अनेक बड्या नेत्यांना 'बीआरएस' मध्ये आणले. नुकत्याच देशात झालेल्या लोकसभा निवडणुकीत बी.आर.एस.पक्षाने तटस्थ राहण्याची भूमिका घेतली. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत 'बीआरएस'ची भूमिका काय असणार आहे, कंधार - लोह्याचे राजकीय, सामाजिक दृष्ट्या आणि विकासाने गत दहा वर्षात मोठे नुकसान झाल्याची खंत शंकर अण्णा नेहमी व्यक्त करीत असतात, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर होत असलेल्या या रसाळी कार्यक्रमात या सर्व घडामोडीवर शंकर अण्णा धोंडगे काय बोलणार,का हा कार्यक्रम कौटुंबिकच होणार हे शुक्रवारीच स्पष्ट होईल.

# कष्ट व गुणवत्तेच्या बळावर या मुलांनी अल्पावधीत यश संपादन केले-आ.धस

### बळेवाडीत आ.सुरेश धस यांच्या हस्ते भूमीपुत्रांचा विशेष सन्मान संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

अतिशय खडतर परिस्थितीत या यशामागे विद्यार्थी त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण,पालक व नातेवाईक यांचे मोलाचे योगदान आहे. प्रामुख्याने आपल्या परिसरातील मुले ही मैदानी खेळात एक पाऊल पुढे असल्याने त्यांना विविध स्पर्धात्मक युगात विशेष गुणांची मदत होत आहे.कोरोनाच्या नंतर आपली मुले खेळाचे खुले मैदान विसरून गेले आहेत. येणाऱ्या पिढीच्या शारीरिक क्षमतेबाबत अडचणी निर्माण होत आहेत.ग्रामीण भागात शिक्षण घेत आपल्या कष्ट व गुणवत्तेच्या बळावर या मुलांनी अल्पावधीत यश संपादन केले आहे. हा नागरी सत्कार संपन्न होत असताना अतिशय आनंद होतोय असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले. ते बळेवाडी (पारगाव जो.) ता.आष्टी येथे गावातील विविध शासकीय सेवेत भरती झालेल्या व निवड झालेल्या भरती प्रक्रियेतून नियुक्ती मिळालेल्या तरुण-तरुणींचा नागरी सत्कारात बोलत होते.

यामध्ये निलेश रामदास भोसले (म.न.पा), योगेश अशोक भोसले (महाराष्ट्र पोलिस), राहूल गहिनीनाथ भोसले (इंडियन आर्मी),श्री. कृष्णा भिमराव भोसले (चझडउ परिक्षेतून सहायक नगर रचनाकार), प्रवीण बाळासाहेब भोसले (उखडऋ- केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल), कु. स्नेहा वसंत भोसले (कृषी सहायक), पारगाव जो. येथील सुरेश देविदास भोराडे (कृषी सहायक) यांची निवड होऊन काही जण आपल्या कर्तव्यावर रुजू झालेले आहेत. यांपैकी काही सत्कारमूर्ती उपस्थित नसल्याने त्यांचा पालकांचा सन्मान करण्यात आला आहे.

यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. अशोक महाराज भोसले,किसन महाराज, प्रा.ब्रह्मदेव भोसले सर,ढोबे सर,माजी सरपंच गणेश मोकाशे, सरपंच पोपट शिरोळे, आजिनाथ भोसले उपसरपंच रामेश्वर मोकाशे, ज्ञानेश्वर भोसले मेजर,साबळे सर, वसंत भोसले, आदिनाथ भोसले उपस्थित होते.आ.धस म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात सर्व



साधने व यंत्र योग्यतेनुसारच वापरले पाहिजेत.परंतू त्यामधून आपल्याला जे पाहिजे ते मिळते.तर काही त्याचा दूरउपयोग करतात.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून आमदार सुरेश धस यांनी कौतुक केले.पुढे बोलताना आ.धस म्हणाले,स्वतःच्या गावाला कधी विसरून नका सत्कारमूर्तीने केलेल्या कष्टाने आज शासकीय नोकरीला निवड झाली आहे. त्यांचा आदर्श समोर असलेल्या विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे.तसेच सर्व पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे सतर्कतेने लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा महिलांनीही मुलांना मोबाईल देऊ नये गावामध्ये सर्व पालकांनी मुलांना आठवड्यातून एक तरी दिवस मैदानावर देण्यासाठी पाठवावे तसेच म्हणून तसेच कुटुंबातील मुलांना खेळाची आवड निर्माण करावी तसेच कुटुंबातील सदस्यांनी ही मोबाईलचा वापर कमी करून भाडवणे गरजेचे आहे.गावचा विकास करण्यासाठी तरुण युवकांनी पुढे येण्याचे आवाहनही आ.धस यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर आयोजन आजिनाथ भोसले यांनी केले त्यांच्या आग्रहास्तव आ.धस यांना कार्यक्रमाला उपस्थित राहावे लागले असे मत आ.धस यांनी व्यक्त केले.अश्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याने मुलांना प्रोत्साहन मिळेल व यातून अनेक मुले घडू शकतात असेही शेवटी आमदार धस म्हणाले. यावेळी रामेश्वर बळे, संजय जेवे, राहुल जगदाळे, सचिन लोखंडे, राम धुमाळ, निशांत जेवे, रामराव घरात, प्रदीप कुमठेकर, पप्पू कात्रजकर,चंद्रकांत भोसले, ब्रह्मदेव भोसले, राम पोटफोडे, सुरेश भोसले, ज्ञानेश्वर भोसले, सचिन बोराडे यांच्यासह प्रमुख मान्यवर, विद्यार्थी,तरूण वर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्रोही पत्रकार डॉ.माकणीकर यांना अंडर वर्ल्ड डॉन ठाकूर गँग कडून धमकी

## शर्मा साहब के खिलाफ जायेगा तो ट्रक के नीचे कुचल देंगे!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

हम सुभाष सिंग ठाकूर बाबा के आदमी है, शर्मा साहब के खिलाफ जादा उछल मत, वर्णा ट्रक के नीचे कुचल देंगे! अश्या प्रकारची धमकी अज्ञात इसमांनी विद्रोही पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांना दिली असून धमकवणारे काळ्या रंगाच्या दुचाकी वर हेल्मेट घालून आले होते. अश्या प्रकारची तक्रार आंबेडकरी आरटीआय क्टिविस्ट, विद्रोही पत्रकार डॉ. माकणीकर यांनी मुंबई पोलीस कमिशनर यांना ईमेल द्वारे केली आहे.

विहार सरोवर परिसरात विकासक प्रशांत शर्मा यांनी अनधिकृतपणे बांधकाम करण्यास खोदकाम चालू केले आहे. यामुळे विहार सरोवर छ समतोल तसेच भु - गर्भ पातळी धोक्यात येवून निसर्गाचा ऱ्हास होवू देणार नाही यासाठी बांधकाम बंद तर व्हावेच शिवाय कोण कोणत्या सक्षम व सनदी अधिकाऱ्यांनी कोण कोणत्या परवानग्या दिल्या आहेत, त्यासाठी विकासक प्रशांत शर्मा यांनी कोण कोणती दस्तऐवज आणि कागदपत्रांची पूर्तता केली या संदर्भात चौकशी करावी अन्यथा आत्मदहन करणार असल्याचा इशारा डॉ. माकणीकर यांनी दिला आहे. यामुळे विकसकसह प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. सदरील कामावर शासकीय व प्रशासकीय अडचणी येवू नयेत, कोणी पक्ष संघटनेचा कार्यकर्ता, झोपडपट्टी दादा, सेवेतील अधिकारी यांची हरकत येवू नये यासाठी सत्तेत असलेल्या स्थानिक लोकप्रतिनिधीला लाखो रुपये मॅनेज करण्यासाठी दिलेले आहेत यामुळे येथील रस्त्यावर विहार सरोवर परिसरात खोदकाम करून निघालेल्या मातीचे ढिगारे भरधाव वाहनाने पोवई येथील परिसरात भरणीसाठी डम्पिंग केले जात आहे.या अनधिकृत बाबी विरोधात डॉ. माकणीकर यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतल्यामुळे काळ्या दुचाकीवर दोन अज्ञात हेल्मेटधारी व्यक्तींनी माकणीकर यांना जिवे



मारण्याची धमकी दिली. हेल्मेट च्या आतून ही तोंडावर काळ्या रंगाचा मास्क व काळ्याच रंगाचा डोळ्यावर गॉगल लावल्यामुळे चेहरा कळू शकला नाही असे डॉ. माकणीकर यांनी सांगितले.सुभाष सिंह ठाकूर हे एकेकाळी अंडरवर्ल्ड गुन्हेगारी जगताचा राजा दावूद तर नंतर छोटा राजन गँग सोबत कार्यरत होते नंतर त्यांना मुंबई बॉम्बस्फोटात फाशी झाली आणि कालांतराने त्यांना जन्मठेप झाली आहे. उत्तर प्रदेश येथील तुरुंगात ते सजा भोगत असल्याचे समजते पण त्यांच्या नावाचा वापर करून अज्ञात हेल्मेटधारी गुंडांनी डॉ. माकणीकर यांना धमकी दिली आहे.आकृती, हबटावून, विकासक विमल शहा, दिवंगत आमदार रमेश लटके साहेबांचे समर्थक आणि भाजपा नेते मुरजी पटेल, हॉटेल टुरिस्ट चे मालक अशोक राय तसेच दलाल रवी शेट्टी यांच्या पासून स्वतः, मित्र व परिवाराच्या जीविताला धोका असल्याचे पत्र तत्कालीन मा. गृहमंत्र्यांना दिलेले आहे व आता विकासक प्रशांत शर्मा यांच्या पासून धोका आहे, माझ्या, परिवारतील सदस्य तसेच मित्र मंडळीच्या जीवितास काहीही झाले तर जवाबदार विकासक प्रशांत शर्मा यांना धरावे असा ईमेल मुंबई पोलीस कमिशनर यांना केला आहे.निसर्गप्रेमी म्हणून ओळखले जाणारे डॉ. राजन माकणीकर यांना यापूर्वी पठाण गँग, पुजारी गँग तसेच दावूद कंपनी कडून याआधी जिवे मारण्याच्या धमक्या आल्या असल्याचे समजले, डॉ. राजन माकणीकर हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी झटत असून जीवाची पर्वा करत नाहीत, सर्वसामान्य परिवारातील पँथर डॉ. राजन माकणीकर यांना चोवीस तास पोलीस संरक्षण पुरविण्यात यावे. किंवा पिस्तूल परवाना देण्यात यावा अशी मागणी सर्व सामान्य जनतेकडून केली जात आहे.

# लोणार भूमिगत गटार योजनेची पुराव्यानिशी माहिती द्या नसता आमरण उपोषण-उ.बा.ठा.शिवसेना लोणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार येथील भूमिगत गटार योजने विषयी कोणतीही माहिती लोणार येथील सामान्य नागरिकाला नदेतासहा महिन्यापूर्वी केलेले सिमेंटचे रस्ते मधोमध फोडून भूमिगत गटार योजनेचे काम सुरू केले आहे या भूमिगत गटार योजनेची पाणी निचरा कोणत्या पद्धतीने होणार कुठून कुठपर्यंत होणारयामध्ये कोणत्या आकाराचे व्यासाचे पाईप वापरणारव सदरील गटारीचे घाण पाणी कोठे साठवणारहि योजना आताची लोकसंख्या व भविष्यत १० वर्षाने किती लोकसंख्या वाढेल व हि भूमिगत गटार



योजना पुढील किती वर्षाचा अंदाज बांधून करण्यात आली आहे याविषयीची माहिती कुणालाही नाही,त्याचबरोबरलोणार सरोवर शेजारी माळीवाडापरिसरयेथे खोदकाम करत आहात. सरोवर संवर्धन समिती व पुरातत्व विभागा कडून सरोवर परिसरात कोणतीही खोदकाम,कोणत्याही प्रकारच्या मशीनचा वापर या सायलेंट झोनमध्ये करू नये असा नियम असताना आपण३०--३०फूट खोल व१२--१२फूट रुंद खड्डे खोदून पुरातत्व विभागाच्या नियमांचे उल्लंघन कोणत्या आधारे केले याची संपूर्ण माहिती येत्या सात दिवसात लोणार येथील जनतेसमोर ऊजागर करण्यात यावी व पुराव्यानिशी त्या सर्व कागदपत्रांची एक प्रत आम्हाला देण्यात येईल देण्यात यावी.येत्या सात दिवसात सदरील माहिती समाजास व आम्हास न मिळाल्यास आठव्या दिवशी म्हणजेच ०७ जून २०२४ ला आम्ही नगरपालिकेसमोर आमरण उपोषणास बसूत याची गांभीर्याने नोंद घ्यावी अशी चेतावणी शिवसेना उभा ठाकरे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे, शहर प्रमुख गजानन जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन आंभोरे यांनी दिली याप्रसंगी शिवसेनेचे परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, जीवन घायाळ तेजराव घायाळ, राजुभाऊ बुधवत,अमोल सुटे, असरुबा धारकर, गणेश पाठे, किरण कमडे, इत्यादी शिवसैनिक उपस्थित होते

# चरित्र निर्माण संस्कार शिबिराचा सांगता समारोह उत्साहात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

ग्लोबल महानुभाव संघाच्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणाऱ्या शिबिराचा सांगता समारोह गुरुवारी, ३० मे रोजी सायंकाळी ६ वाजता महंत नागराज बाबाजीच्या आशीर्वादाने व प्रसन्नतेने तसेच प. पू. नागराज बाबाजी (आत्याबाई ) प. पू. संतोष मुनी शास्त्री यांच्या आशीर्वादाने महानुभाव आश्रमात संपन्न झाला. या सोहळ्याला छत्रपती संभाजीनगराच्या माजी महापौर अनिता घोडेले यांची उपस्थिती होती.२१ मे पासून सुरू असलेल्या निवासी शिबिरात १६० मुलांचा सहभाग होता. दैनिक कार्यक्रमात दोन बौद्धिक सत्र संपन्न होत होते. त्यात एक धार्मिक व एक समाजिक स्वरुपाचे ज्ञान मुलांना देण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा या करिता सांस्कृतिक व मैदानी कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले. मोनिका बकाल यांच्या अथक प्रयत्नांतून मुलांनी खूप आनंद घेतला व शिक्षण घेतले. श्रीमान बाळकृष्ण अंजनगावकर (नाशिक) यांची पूर्ण वेळ उपस्थिती होती. श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम ट्रस्ट व ग्लोबल महानुभाव संघाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

शिबिरात सहभागी मुला-मुलींना पारितोषिके देण्यात आली. माजी महापौर अनिता घोडेले यांच्या मार्गदर्शनाने व सांस्कृतिक कार्यक्रमाने सामारोप सोहळ्याची सांगता झाली. राष्ट्रभक्ती संस्कार व चरित्र निर्माण या तिन्ही आयामाच्या आधारे शिबीर संपन्न झाले. यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महत्वाचे सहकार्य लाभले.



**पाटोदा:- बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा-पाटोदा येथे दिनांक ०३ जून रोजी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची १० पुण्यतिथी प्रतिमा पूजन व अभिवादन करून साजरी करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक तथा पत्रकार विजय जोशी, अबलुक घुगे, विष्णू सांगळे, राजेंद्र भोंडवे, शाखा अधिकारी सुनील खाडे, श्रीमती घुमरे मॅडम यांच्या सह शाखेतील कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

# मोरगाव शिवारात वीज पडुन ४५०० ज्वारीच्या कडब्याची गंज जळुन खाक लाख रुपयांचे नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड तालुक्यातील मौजे.मोरगाव शिवारातील लक्ष्मणबाबाचा माळ याठिकाणी आज दि.३ सोमवार रोजी सायंकाळी साडेपाच वाजता वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसात वीज पडुन पोपट सोनबा जाधव या शेतकऱ्याची ४५०० कडब्याची गंज जळुन खाक झाली असुन यात जवळपास १ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सोमनावाडी येथील रहिवासी असणारे पोपट सोनबा जाधव आपल्या पत्नी व मुलासह गेल्या सहा वर्षांपासून मोरगाव येथील बापुराव कागदे यांच्या मालकीच्या १० एकर शेतामध्ये




बटईने राबत होते. मोरगाव पासुन १ किलोमीटर अंतरावरील लक्ष्मणबाबाचा माळ याठिकाणी पत्र्याच्या घरात वास्तव्य करून राहतात.आज सायं साडेपाच वाजता घरी असताना अचानक वीज कडाडल्याचा आवाज आला. त्यांचा मुलगा संतोष यांने घराबाहेर पाहिले असता आवाज आलेल्या ठिकाणी ज्वारीच्या कडब्याची गंजीने पेट घेतला होता. तिघांनी हंड्याने पाणी घेऊन जाळ विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आग आटोक्यात आलीच नाही. सायं साडेपाच वाजल्यापासून पेटलेली गंज रात्री साडे नऊ वाजेपर्यंत पेटलेलीच होती.यात ज्वारीच्या ४५०० कडबा जळुन खाक झाला असुन जवळपास १ लाख रूपयांचे नुकसान झाले. तलाठी मंडळ अधिकारी यांना फोनवरून कल्पना दिली असता आम्हाला फोटो पाठवा आम्ही ऊद्या येऊन बघतो असे उत्तर त्यांना मिळाले. आपत्ती व्यवस्थापनाच्या नावाने गाजावाजा करणा-या प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन त्यांना नुकसान भरपाई द्यायला पाहिजे,


# कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यात पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक लुट; महसूल व पोलीस प्रशासन शेतकऱ्यांच्या मुळावर-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा आणि पवन उर्जा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक आणि आर्थिक लुबाडणूक होत असुन संबंधित प्रकरणात शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाला लेखी तक्रार करून न्याय मागितल्यावर महसूल व पोलिस प्रशासन सहकार्य करत नसुन याउलट कंपन्यांची आर्थिक हितसंबंध जोपासत पाठराखण करत असुन शेतकऱ्यांना दलाल आणि गुंडामार्फत दमदाटी व पोलीस प्रशासनामार्फत गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन मुस्कटदाबी करण्यात येत असून एकंदरीतच कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुळावर पुढारी, महसूल व पोलीस प्रशासन उठल्याचे दिसत असुन संबंधित प्रकरणात चौकशी करून संबंधित कंपन्या व महसूल व पोलीस प्रशासनातील आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस च-हाटकर,



रामनाथ खोड यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना केली आहे.

अपारंपारिक ऊर्जा निर्मितीला केंद्र सरकारचे प्रोत्साहन असुन यासाठी अगदी केंद्र स्तरावरून यंत्रणा कार्यान्वित होते.

बीड जिल्ह्यात सध्या सौर ऊर्जा आणि पवनचक्की प्रकल्पांचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असुन शेतकऱ्यांच्या अज्ञानी पणाचा फायदा घेत चुकीची माहिती देऊन नियमांना तिलांजली देऊन कंपनीचे अधिकारी शेतकऱ्यांना जमिनीचे व्हॅल्युएशन कमी असल्याचे सांगत सदर जमीनीचे मुल्यांकन ठरवत अल्प दरामध्ये जमिनीची खरेदी व भाडे पट्टा व्यवहार महसूल प्रशासनातील अधिकारी यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांची फसवणूक आणि आर्थिक लुट करत असल्याचे दिसून येत आहे. सौरऊर्जा आणि पवनचक्की कंपन्यांनी त्या त्या भागातील एजंट शोधून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना गोड बोलुन मोठ्या प्रमाणात पैसा मिळेल, मुलांना नोकरी मिळेल अशा प्रकारची वेगवगळी आमिषे दाखवुन खोटी माहिती देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करतात.शेतक-याची ठराविक जागा ताब्यात घेऊन प्लांन्टचे काम सुरू झाल्यानंतर मात्र त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या नव्हे तर कंपन्यांच्या पाठीशी उभा रहात असुन फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी कंपन्यांशी भांडु लागले तर शेतकऱ्यांना कायद्याचा धाक दाखवून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील अशा धमक्या देऊन त्यांची मुस्कटदाबी करण्यात येत असुन यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक हितसंबंध जोपासत कंपन्यांची पाठराखण केल्याचे बोलले जाते.शेतकऱ्यांना विचारत न घेताच हस्तकांमार्फत कंपन्यांच्या गाड्यांसाठी रात्रीचे रस्ते तयार करण्यात येत असुन त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतरस्ता संदर्भात वादविवाद वाढले असुन संबंधित प्रकरणात पोलिस प्रशासन कंपन्यांची पाठराखण करताना दिसत आहे.

# मतमोजणीसाठी नियुक्त निरीक्षकांनी केली मतमोजणी केंद्राची पाहणी

## निवडणूक यंत्रणा सज्ज;सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात;चोख सुरक्षा व्यवस्थेत होणार मतमोजणी;मतमोजणी केंद्रात मोबाईलला बंदी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीसाठी नियुक्त मतमोजणी निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना आणि श्री. एम. पी. मारुती यांनी मतमोजणी केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रत्येक मतमोजणी कक्षातील व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच जिल्हा निवडणूक यंत्रणेने केलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती मेघना कावली, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, सहायक निवडणूक अधिकारी क्रांति डोंबे, डॉ. सखाराम मुळे, डॉ. सचिन खल्लाळ, अविनाश कांबळे, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डी. जी. पोत्रे यांच्यासह यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

मतमोजणी निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना आणि श्री. एम. पी. मारुती यांनी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यांची आसनव्यवस्था, विधानसभा क्षेत्रनिहाय तयार करण्यात आलेले सहा मतमोजणी कक्ष, टपाली मतमोजणी कक्ष, ईटीपीबीएमएस कक्ष, एनकोअर कक्षाची पाहणी केली. तसेच याठिकाणी मतमोजणीसाठी करण्यात आलेल्या सज्जतेचा आढावा घेतला.

तसेच टपाली मतमोजणी कक्षाला भेट दिल्यानंतर इन्कोअर अँप, ईटीपीबीएस आणि टँब्युलेशन शीटबाबात मतमोजणी निरीक्षकांनी जिल्हा सूचना अधिकारी बारी सिद्दिकी यांच्याकडून माहिती जाणून घेतली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी मतमोजणी निरीक्षकांना केंद्रातील यंत्रणेबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी येथील माध्यम कक्षाला भेट दिली. माध्यम कक्षात माध्यम प्रतिनिधींना मतमोजणीची उमेदवारांना पडलेली फेरीनिहाय मतांची तात्काळ माहिती व्हावी, तसेच देशभरातील मतदार संघाचे निकाल पाहता यावेत, यासाठी तशी सुविधा पुरविण्यात येणार आहे.

निवडणूक आयोग किंवा यंत्रणेकडून प्राप्त सुरक्षा पासधारकांनाच मतमोजणी केंद्रात प्रवेश मिळणार आहे. येथे तीन स्तरीय सुरक्षा यंत्रणा तैनात असून, मतमोजणी निरीक्षक, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना मोबाईल वापरता येणार असून, इतरांना मोबाइल बंदी आहे.

**वैद्यकीय कक्ष स्थापन**

मतमोजणी केंद्र परिसरात मतमोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी - कर्मचारी, किंवा उमेदवार वा त्यांचे प्रतिनिधींचे आरोग्य बिघडल्यास त्यांना तात्काळ उपचार मिळावेत, यासाठी येथे वैद्यकीय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आगीसारखी घटना घडू नये यासाठी अग्निशामक दलाकडून येथे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कम्युनिकेशन हॉलचीही येथे व्यवस्था उभारण्यात आली आहे.

**९४ टेबलवर होणार मतमोजणी**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत, कळमनुरी व हिंगोली, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि नांदेड जिल्ह्यातील किनवट व हदगाव असे एकूण सहा विधानसभा क्षेत्र या लोकसभा मतदारसंघात आहेत. एका विधानसभा मतदारसंघासाठी १४ टेबल असे एकूण ८४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. याशिवाय पोस्टल बॅलेटसाठी ८ आणि ईटीपीबीएससाठी २ टेबल आहेत. थोडक्यात हिंगोली लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ९४ टेबलवर होणार आहे.

**एकूण मतदार व प्रत्यक्षात झालेले मतदान**

हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे मतदान हे दुस-या टप्प्यात २६ एप्रिल २०२४ रोजी २००८ मतदान केंद्रांवर पार पडले. या मतदारसंघामध्ये १८ लाख १७ हजार ७३४ मतदार आहेत. त्यापैकी ९ लाख ४६ हजार ६७४ पुरुष, ८ लाख ७१ हजार ०३५ महिला तर २५ तृतीयपंथीय मतदारांचा समावेश आहे. या एकूण मतदारांपैकी ६ लक्ष २८ हजार ३०२ पुरुष, ५ लक्ष २६ हजार ६४४ महिला तर ९ तृतीयपंथीय अशा एकूण ११ लक्ष ५४ हजार ९५५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये पुरुष ६६.३७, महिला ६०.४६ आणि ३६ टक्के तृतीयपंथीय मतदारांची टक्केवारी राहिली आहे. १५ - हिंगोली लोकसभा मतदारसंघात ६३.५४ टक्के मतदान पार पडले आहे.

**विधानसभा निहाय मतमोजणी फेरी**

१५- हिंगोली लोकसभा मतदारसंघातील विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणीच्या फेऱ्या वेगवेगळ्या राहणार आहेत. यामध्ये उमरखेड २५, किनवट २४, हदगाव विधानसभा मतदार संघासाठी मतमोजणीच्या २३ फेऱ्या होतील. तर वसमत २४, आणि कळमनुरी व हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी प्रत्येकी २५ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार आहे.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून भंग कराल तर,याद राखा

## पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांचे धर्माबाद तालुक्यातील नागरिकांना आव्हान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

पोलीस स्टेशन धर्माबाद हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२४ रोजी पावेतो आदर्श आचारसंहिता अंमलात असून धर्माबाद व संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दिनांक ,०४/०६/२०२४ रोजी,जाहीर होणार .असून त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की १.कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या,जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत.



२.कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये,डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत.तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये

३.व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दिनांक ०३/०६/२०२४ ते दिनांक ०६/०६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये only admin करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत ४.जर ऍडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे यावेळी धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी. सांगितले, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, अभिजित राऊत यांनी जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतमोजणीच्या ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले असल्याचे आदेशात नमूद केले आहे.मतमोजणीच्या केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात सर्व पक्ष कार्यालय, उमेदवारांचे मंडप, सर्व दुकाने, मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स स्मार्ट वॉचेस, निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन व निवडणूक कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश निवडणुकीची कामे हाताळतांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून दि. ४ जून २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजेपासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजित राऊत यांनी कळविले आहे.

# सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख प्रा.मनोहर धोंडे यांनी मुंबई येथे घेतली राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांची भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडीनंतर सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख प्रा मनोहर धोंडे सर यांनी घेतली मुंबई येथील बी.वाय. सेंटर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची सदिच्छा भेट देऊन चालू घडामोडी व विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, हिंदवी बाणाचे संपादक माधव भालेराव, पत्रकार दिगांबर वाघमारे, शेख सिकंदर, मिर्झा बेग आदी उपस्थित होते.

# पोलीस ठाणे सेनगाव तर्फे नागरिकांना जाहीर आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

पोलीस ठाणे सेनगाव जिल्हा हिंगोली हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२४ रोजी पावेतो आदर्श आचारसंहिता अंमलात असून हिंगोलीसह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की



१.कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या,जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत २.कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये,डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत.तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये ३.व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दिनांक ०३/०६/२०२४ ते दिनांक ०६/०६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये पश्रू रवाळप करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत४.जर ऍडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे यावेळी सेनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी सांगितले,

# तब्बल तीस वर्षानंतर झाली वर्ग मित्रांची भेट;जुन्या आठवणींना मिळाला उजाळा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

समाज माध्यमांच्या सदुपयोगाचा एक परिपाक म्हणजे जुन्या वर्गमित्र मैत्रिणीचा होणारा स्नेह भेट सोहळा, अशा समाज माध्यमांमुळे एकत्रित आलेल्या लोणार येथील शाळेमध्ये शिकलेल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींना एकत्रित येण्याचा योग आला, लोणार शहरातील पटेल हायस्कूल महाराणा प्रताप हायस्कूल व श्री शिवाजी हायस्कूल या तीनही महाविद्यालयांमध्ये सन १९९४ ते १९९६ मध्ये दहावी व बारावी झालेल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींचा मेळावा लोणार येथे आयोजित करण्यात आला होता, याच वर्गमित्रांचे तत्कालीन वर्गमित्र असलेले अलोकमुनी श्री यांचा नुकताच लोणार दौरा पार पडलेला आहे आपल्या याच जुन्या वर्ग मित्राला भेटण्यासाठी राज्याचे आणि देशभराच्या कानाकोपऱ्यातून आलेले अलोक मुनी यांचे सर्व वर्गमित्र काल लोणार मध्ये एकत्रित आले होते ३० तारखेला मुनी श्रींच्या दर्शनानंतर ३१ तारखेला तत्कालीन कार्यरत असलेले शिक्षक प्राध्यापक कुळसुंदर सर रेदासनी सर, जी एस मापारी सर कांताराव अंभोरे सर सुपटयान सर,अंबादास मापारी सर या सर्वांच्या उपस्थितीत असणे भेट मेळावा रंगला, तब्बल तीस वर्षानंतर एकत्र झालेल्या मित्र-मैत्रिणींच्या जुन्या आठवणींना या निमित्ताने उजाळा देण्यात आला मागच्या तीस वर्षात ज्या मित्र-मैत्रिणींनी या जगाचा निरोप घेतला त्यांना श्रद्धांजली सुद्धा वाहण्यात आली एकंदरीतच अतिशय वेगळया आठवणींच्या या मेळाव्यामध्ये सर्वजण आपल्या बालपणीच्या आठवणींमध्ये रमलेली दिसले सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हाट्सअप ग्रुप या सर्व वर्ग मित्रांनी बनवला होता आणि त्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे यांची भेट होऊ शकली या कार्यक्रमाचे आयोजन मेकर रोडवरील शिवशंभू मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते कार्यक्रमाचे आयोजनासाठी पुढाकार घेतलेल्यांमध्ये डॉक्टर भास्कर मापारी, जम्मू सिंगी, प्रमोद राका,शितल रेदासनी लातूरच्या उद्योजिका वंदना कोटेच्या, चार्टर्ड अकाउंटंट सचिन संचेती, डी एफ ओ सचिन शिंदे, कैलास बचाटे,विलास जाधव पवन कोठारी यांनी आपल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींना एकत्रित करीत हा सोहळा या ठिकाणी आयोजित केला होता या निमित्ताने उपस्थित शिक्षकांचा हृदय सत्कार सुद्धा करण्यात आला, जीवनाच्या आपलं जीवन तणाव मुक्त कसे व्यतीत करायचं याविषयीचे मोलाचं मार्गदर्शन या त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना केलं या सोहळ्यासाठी एसटीआय दिलीप जाधव संभाजीनगरच्या महापालिका सदस्य राखी खटोड, वंदना वरकड,अर्चना चोपडे, रेवती मोरे वंदना कुळसुंदर, डॉक्टर पंकज जोशी, डॉक्टर प्रवीण बनमेरू, सोनल संचेती,कीर्ती तोष्णीवाल,सोनाली खटोड,उमेश कुटे, अजित खिवसारा ,त्रिपुरा इथून आलेले सुनील लाटे, सचिन बेदमुथा,राजेश शर्मा यांच्यासह ६५ वर्गमित्र मैत्रिणी या स्नेह भेट सोहळ्यात एकत्र आले होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904